# हसरी संस्कृत सुभाषिते

सरिता पदकी



संस्कृत सुभाषितांचा हसण्याखिदळण्याशी काही संबंध असेल असं चुकूनही कुणाच्या मनात येणार नाही. सुभाषितं म्हणजे जीवनाचा आशय चार अर्थपूर्ण ओळीत गंभीरपणे मांडणारी रचना असंच आपल्या मनात असतं. उगीच का त्यांना रत्नं म्हणतात? अगदी छोटा आकार आणि त्यात ठासून भरलेलं ज्ञान म्हणजे सुभाषितं.

पृथिव्यां त्रीणि रत्नानि, जलम्, अन्नम्, सुभाषितम्।
मूढैः पाषाणखंडेषु रत्नसंज्ञा विधीयते।।

असं सुभाषितांच्या महतीचं वर्णन सुभाषितकारांनीच करून ठेवलं आहे! शहाणं करून सोडण्याच्या उद्देशानं लिहिलेले हे अर्थगर्भ श्लोक वाचून हसणाऱ्याचंच हसू व्हायचं.

पण थांबा, संस्कृत सुभाषितंही हसरी आहेत, हसवू शकतात, जीवनाकडे पाहण्याचा एक वेगळाच दृष्टिकोण देत आपल्या चेहऱ्यावर एखादी स्मितरेषा उमटवण्यापासून खदाखदा हसवण्याची जादू करतात. या अशा हसऱ्या सुभाषितांचा वानवळा आपण आता पाहणार आहोत. विदूषकी चाळे नसलेला बौद्धिक विनोद आपण अनुभवणार आहोत.

जी वाचून आपण स्वतःला ( निदान स्वतःपुरते ) विद्वान समजतो त्या पुस्तकापासून, त्यातून मिळणाऱ्या विद्येपासून सुरुवात करूया. आपण पुस्तक कसं वापरतो? किती जपतो त्याला? त्या बिचाऱ्या मुक्या वस्तूची काय मागणी असते? किती छान सांगितलंय पहा या श्लोकात. . .

तैलाद्रक्षेत् जलाद्रक्षेत् रक्षेच्छिथिलबन्धनात्।
मूर्खहस्ते न दातव्यं एतद्वदति पुस्तकम्।।

पुस्तकाचं बिचाऱ्याचं एवढंच म्हणणं आहे की माझ्यावर तेलाचे डाग पाडू नका, मला पाण्यात भिजवू नका, माझी बांधणी

ढिली करू नका, आणि सर्वात महत्वाचं म्हणजे मला मूर्ख माणसाच्या हातात देऊ नका!

आपण किती व्यवस्थितपणे पुस्तकं हाताळतो आणि किती 'शहाणपणानं' ती वाचतो याच्यावरच हे टीकास्त्रं झोंबणारं तर आहेच पण स्वतःलाच हसायलाही लावणारं आहे नां?

पुस्तक नुसतं वाचलं, पाठ केलं, परीक्षेत ओतून दिलं की झालं, झालो आपण विद्वान, अशी अनेकांची खात्री असते. पण विद्या नुसती पुस्तकात असून भागत नाही, ती अंगवळणी पडावी लागते. 'पोहावे कसे?' असं पुस्तक नुसतं वाचून पाण्यात बुडी मारली तर गटांगळ्याच खायची वेळ येणार. पुस्तकातली विद्या म्हणजे दुसऱ्याच्या हातातलं धन. आपल्या वेळेला ते कसं कामाला येणार?

पुस्तकस्था तु या विद्या परहस्तगतं धनम्।
कार्यकाले समुत्पन्ने न सा विद्या न तद्धनम्।।

नुसती पुस्तकी विद्या आणि दुसऱ्याच्या हातातलं धन यांचा काय उपयोग? प्रत्यक्ष कामाची, उपयोगाची वेळ आली की ती विद्या आणि धन काय कामाचं? पुस्तकी पांडित्याला छान चिमटा घेतलाय नां?

पढिक पंडिताला या श्लोकात कोणाची उपमा दिली आहे पहा तर. . .

यथा खरश्चन्दनभार वाही
भारस्य वेत्ता न तु चन्दनस्य।
एवं हि शास्त्राणि बहून्यधीत्य
अर्थेषु मूढाः खरवद्वहन्ति।।




पाठीवर चन्दनाची मोळी नेणाऱ्या गाढवाला तिचं फक्त ओझं जाणवतं, ती मोळी चन्दनासारख्या सुगंधी लाकडाची आहे हे जाणवत नाही त्याप्रमाणे खूपशा शास्त्रांचा अभ्यास केलेल्याला पण त्यांचा अर्थ न जाणणाऱ्याला त्या गाढवाचीच उपमा द्यायला हवी. ते फक्त ओझ्यांचे धनी! ओझ्याच्या आत काय आहे हे त्यांना कसं कळावं?

शब्दांचे खेळ करीत गंमत अनुभवणे हाही संस्कृत रचनाकारांचा एक छंद. याची पुष्कळ उदाहरणं सापडतील.

कंबलवन्तं न बाधते शीतम्?।
कंबलवन्तं न बाधते शीतम्।।

कंबलवन्तं या शब्दाची फोड करून प्रश्न विचारलाय, फोड न करता उत्तर दिलंय! ( कंबलवन्तं म्हणजे कांबळं पांघरणाऱ्याला )

असाच शब्दांचा खेळ करून पढिक विद्वानांच्या आणि रसवेत्त्यांच्या वृत्तीतील फरकसांगतांना रचलेला हा श्लोक पहाः

साक्षरा विपरीताश्चेद्राक्षसा एव केवलम्।
सरसो विपरीतश्चेद्सरसो एव केवलम्।।

अर्थ न समजता केवळ अक्षरांचा धनी असलेला माणूस – साक्षर– जर उलटला तर राक्षस होतो. ( साक्षराः – राक्षसाः ) पण ज्याला शब्दांमागील अर्थ जाणवला आहे असा रसिक – सरस– माणूस जरी उलटला तरी सरसच राहतो! केवळ शाब्दिक ज्ञान आणि अंतर्गत अर्थाचं रसमय आकलन यातला फरक किती हसत खेळत सांगितला आहे!

पण विद्वानाला समाजात कदाचित् मान्यता असली तरी उदरभरणासाठी त्याला कितीतरी तडजोडी कराव्या लागतात. त्याचा उबग येऊन तो म्हणतो. . .

अस्य दग्धोदरस्यार्थे किं किं न हि कृतं मया।
वानरीमिव वाग्देवीं नर्तयामि गृहे गृहे।।

या माझ्या पोटाची खळगी भरायला मी कुठली गोष्ट करायची बाकी ठेवली असेल. अहो माझ्या विद्येला – सरस्वतीला– मी माकडिणीसारखी दारोदार नाचवली. माझ्या ज्ञानाचं प्रदर्शन करून चार पैसे मिळवायला मी असा दारोदार हिंडलो. स्वतःचं लेखन वाचकांना आवडावं म्हणून मनातल्या आशयाशी तडजोड करत भारंभार पुस्तकं लिहिणाऱ्यांना केव्हातरी असंच वाटत

असेल कां?

आणि असे बनचुके लेखक आणि कवि जेव्हा एकत्र येऊन एकमेकांना दाद देतात, वाहवा म्हणतात तेव्हा हा श्लोक आठवतो. . .




उष्ट्राणां च विवाहेषु मंत्रान् गायन्ति गर्दभाः।
परस्परं प्रशंसंन्ति अहो रूपम् अहो ध्वनिः।।

उंटाच्या लग्नात गीतं म्हणायला गाढवं आली. 'काय छान गाता हो तुम्ही गर्दभराज! किती मधुर आहे तुमचा आवाज!' उंट गाढवांना म्हणतो. गाढवही परतफेड करत म्हणालं, 'किती सुंदर दिसता हो तुम्ही उंट महाराज!' अशी एकमेकांची प्रशंसा करून त्यांनी लग्नमंडपाला शोभा आणली!

प्रसिद्धी मिळवायला माणसानं काहीही करावं, एखादं मडकंजोरात फोडावं, एखादा कपडा टराटरा फाडावा किंवा अगदी एखाद्या गाढवासारखं मनमोकळं ओरडून लोकांच्या कानात शिरावं पण प्रसिद्धी मिळवल्याशिवाय राहू नये असं सांगणारा हा श्लोक पुष्कळांच्या परिचयाचा असेल. . .

घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्याद्वा रासभध्वनिम्।
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्।।

अर्थात प्रत्येकानं प्रसिद्ध व्हायलाच पाहिजे असा काही नियम नाही!

असाच एक व्याकरण चांगलं जाणणारा पण –अर्थातच दरिद्री विद्वान राजाच्या दरबारात याचनेसाठी गेला. 'मी गरीब आहे महाराज, मला काहीतरी दान द्या' असं स्पष्ट म्हणायची त्याला लाज वाटली. मग त्यानं व्याकरणाच्या भाषेत म्हटलं

अहं च त्वं च राजेन्द्र लोकनाथावुभावपि।
बहुव्रीहिरहं राजन् षष्ठीतत्पुरुषो भवान्।।

महाराज, तुम्ही आणि मी तसे सारखेच आहोत, लोकनाथच आहोत. फक्त माझ्या नावाचा समास 'लोक आहेत नाथ ज्याचा' असा सोडवावा लागेल तर तुमचा 'लोकांचा नाथ' असा सोडवावा लागेल. थोडक्यात म्हणजे मी सगळ्यांचा दास आहे आणि आपण सगळ्यांचे मालक आहात!
आता एवढी व्याकरणी मखलाशी ऐकून राजा डोकं धरून बसला की त्यानं काही देणगी दिली हे समजायला काही वाव नाही!

आशानाम मनुष्याणां
काचिदाश्चर्यशृंखला।
यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति
पंगुवत्।।




आशेला साखळदंड म्हणतात. पण हा साखळदंड किती विचित्र आहे पहा. यानं बांधलेला माणूस पळत सुटतो आणि या साखळदंडातून सुटलेला माणूस अपंगासारखा बसून राहतो!

आणि आशेचं हे दुसरं–पतिव्रतेचं रूप पहा. . .

क्षुद्,तृट् आशाः कुटुंबिन्यः मयि जीवति नान्यगाः ।
तासाम् आशाः महासाध्वी कदाचित् मां न मुञ्चति ।।

क्षुधा, तृषा आणि आशा अशा मला तीन पत्नी आहेत. ( द्विभार्याप्रतिबंधक कायदा होण्याच्या आधीचा हा श्लोक आहे ) मी आहे तोवर त्या दुसऱ्याकडे जाणार नाहीत. पण त्यातली आशा ही सर्वात निष्ठावान पतिव्रता आहे. ती मला कधीच सोडून जाणार नाही!

आशेपासून कधीही घटस्फोट मिळण्याची आशा कवीला नाही.

उपचार केल्यानंतर बरं वाटेल अशी आशा रुग्णाला आणि त्याच्या नातेवाईकांनाही असते. या आशेवरच तर वैद्यराजांच्या कीर्तीचा डोलारा उभा असतो. पण सगळेच वैद्य ज्ञानी असतात थोडेच?

यस्य कस्य तरोर्मूलं येनकेनापि मिश्रितम् ।
यस्मैकस्मै प्रदातव्यं यद्वातद्वा भविष्यति ।।

असला दृष्टिकोण असणारे वैद्यच अधिक असतात. कुठल्यातरी झाडाची मुळी घ्यायची, ती कशात तरी घोटायची, ते औषध कुणाला तरी द्यायचं अन् मग याचं किंवा त्याचं असं किंवा तसं होईल! केवढा तज्ज्ञ हा वैद्यराज! म्हणून तर त्याला म्हणायचं. . .

वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर ।
यमस्तु हरति प्राणान् वैद्यः प्राणान् धनानि च ।।

बाबा वैद्यराजा, तुला नमस्कार असो. कारण तू यमराजाचा सख्खा भाऊ आहेस. फरक एवढाच की यमराज प्राणाचं हरण करतो तर वैद्यराज प्राणांबरोबर पैसाही नेतो!

आपल्या देवदेवतांची रूपं निर्माण करतांना आपल्या पूर्वजांनी मारे कल्पनाशक्ति चालवली असेल आणि त्यांची अद्भुतरम्य प्रतिमा निर्माण केली असेल. पण त्यांनाही आपल्या व्यावहारिक पातळीवर आणून हास्यविनोद करणारे कवीही आपल्याला सापडतात.

लक्ष्मी कमळात, विष्णू क्षीरसागरात आणि शंभुमहादेव हिमालयात विश्राम करतात असे आपल्याला पुराणातून कळते. पण या आगळयावेगळया शय्यागृहांची निवड त्यांनी कां बरे केली असावी बरं? कवि काय सांगतो ते बघा आणि कपाळाला हात लावून घ्या.

कमले कमला शेते हरिः शेते महोदधौ ।
हरो हिमालये शेते मन्ये मत्कुणशंकया ।।

मत्कुण म्हणजे ढेकूण. तर ही देवमंडळी अशा अफलातून ठिकाणी झोपतात ते ढेकूण चावू नयेत म्हणून!

आणखीही एक कारण आहे विष्णु क्षीरसागरात आणि शंकर हिमालयात का राहतो त्याचं. कारण त्या दोन्ही जागा त्या दोघांच्या सासुरवाडया आहेत! पार्वती ही हिमालयाची आणि लक्ष्मी ही सागराची कन्या ना! म्हणजे या दोन्ही त्या दोघांच्या सासुरवाडयाच! जगाचे टक्केटोणपे खाऊन कंटाळलेल्या या दोन्ही देवांनी सासुरवाडीला मुक्काम केलाय.



असारे खलु संसारे सारं श्वशुरमन्दिरम।
हरो हिमालये शेते हरिः शेते महोदधौ।।

भोळया शंकराची आणि त्याच्या अफलातून कुटुंबाची चेष्टा करण्याची संधी कवि कसा सोडेल?

स्वयं महेशः श्वशुरो नगेशः
सखा धनेशस्तनयो गणेशः।
तथापि भिक्षाटनमेव शम्भोः
बलीयसी केवलमीश्वरेच्छा।।

शंकर स्वतः किती मोठा आणि त्याचे हितसंबंधी तरी काही लहानसहान आहेत कां? पण त्याच्या बिचाऱ्याच्या नशीबाचं भिक्षा मागत फिरणं काही टळलं नाही! ईश्वराची इच्छा!शंकर स्वतः महेश, मुलगा गणांचा ईश म्हणजे गणेश, सासरा नगांचा ईश म्हणजे हिमालय, सखा कुबेर म्हणजे धनेश. इतकं सारं असूनही. . .

शंकर आाणि त्याचे दोन मुलगे तसे प्रचंड खाणारे. आणि दिशा हेच वस्त्र समजणाऱ्याच्या घरात संपत्ति तरी काय असणार? अन्नपूर्णा पार्वती घरात आहे म्हणून सगळयांची पोटं भरतायत इतकंच!

स्वयं पंचाननः पुत्रौ गजाननषडाननौ।
दिगंबरः कथं जीवेत् अन्नपूर्णा न चेद्गृहे।।

स्वतः पंचानन — पंच म्हणजे पाच किंवा भयंकर– पुत्र एक हत्तीच्या तोंडाचा तर दुसरा सहा तोंडांचा म्हणजे षडानन. बरं वस्त्र म्हणायचं तर ते म्हणजे दिशा, म्हणजे नाहीच, इतकी गरीबी घरात. बिचारी पार्वती आहे म्हणून सगळयांना अन्न तरी मिळतंय!

शंकरानं समुद्रमंथनातून निघालेलं हलाहल कां प्यायलं? त्रिभुवनाचा दाह होऊ नये म्हणून. पण या उदात्त हेतूला नजरेआड करून हा थट्टेखोर कवि काय म्हणतो ते पहा. त्याआधी शंकराच्या कुटुंबाचं चित्र डोळयापुढे आणा. . .

अत्तुं वाञ्छति शाम्भवो गणपतेराखुं क्षुधार्तः फणी
तं च कौञ्चपतेः शिखी च गिरिजासिंहोपि नागाननम्।
गौरी जह्नुसुतामसूयति कलानाथं कपालानलो
निर्विण्णः स पपौ कुटुंबकलहादीशोऽपि हालाहलम्।।

शंकरानं हलाहल प्यालं ते कुठल्या उदात्त हेतूने नव्हे तर घरातल्या भांडणांना कंटाळून! शंकाराच्या गळयातल्या नागाला भूक लागली आणि त्याला गणपतीच्या उंदरावर झडप घालावीशी वाटली, त्या नागावर कार्तिकेयाच्या मोराची नजर होतीच, पार्वतीचं वाहन असलेला सिंह गणपतीचं हत्तीचं रूप कसं सोडणार?( सिंह हत्तीवर झडप घालून त्यांची शिकार करतात) पार्वतीला महादेवाच्या डोक्यावर बसलेल्या गंगेबद्दल असूया वाटणारच आणि महादेवाच्या तिसऱ्या डोळयातल्या अग्नीला चंद्राला



आपल्या वरची जागा मिळाली याचा मत्सर वाटणारच. या सगळ्या भांडणांना कंटाळूनच शंकरानं विष प्यायलं बरं!

विष पिऊन शंकर मोकळा झाला पण पार्वतीनं मात्र घरच्या भांडणांना हसून सहन करण्याचं स्त्रीचं चातूर्य दाखवलं. तिच्या दोन्ही मुलांची रूपं आणि त्यांच्या खोडया पहा. . .

हे हेरम्ब, किमम्ब, रोदिषि कथं, कर्णौ लुठत्यग्निभूः
किंते स्कन्द विचेष्टितं, मम पुरः संख्या कृता चक्षुषाम्।
तत्ते नह्युचितं गजास्य चरितं, नासा प्रमीता च मे
तावेवं सहसा विलोक्य हसितव्यग्रा शिवा पातु नः ।।

'बाबा गणेशा'
' काय आई?'
'असा रडतोयस का?'
'माझे ( हत्तीचे ) कान दादानं ( कार्तिकेयानं ) दुमडले'
'काय हे कार्तिकेया, बरं दिसतं का असं वागणं? '
' मग माझ्यादेखत याने माझे डोळे का मोजावे?'( कार्तिकेयाला सहा तोंडे म्हणजे बारा डोळे )
'गजानना, हे वागणं बरोबर नव्हे'
'माझ्या नाकाची ( सोंडेची ) लांबी का बरं मोजावी त्यानं मग?'

त्या दोघांचं हे असलं भांडण ऐकून पार्वतीची हसूनहसून मुरकुंडी वळली!

अशी पार्वती आपलं रक्षण करो!

. . . आणि संसातल्या अडचणीना हसतहसत तोंड द्यायला आपल्याला शिकवो!

☺☺☺